# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./अप/09/2022 दिनांक :-२८/८/2022

प्रति,
श्री. सजी.आय.पी.
शॉप क्र. 08, हॅप्पी होम अपार्टमेंट क्र. 01,
शांती पार्क, मिरारोड (पूर्व)

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
ॲड प्रशांत डी. पंचाकशरी ह्यांनी दि. 10 मे 2022 रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईची माहिती मिळणेबाबत.

संदर्भ :-
1) आपणांकडील दि. 25/07/2022 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./51/2022, दि. 8/8/2022.
3) आपणांकडील दि. 07/09/2022 रोजीचा प्रथम अपिलीय अर्ज.
4) मा. अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचेकडील दि. 23/09/2022 रोजीचा अपिलीय अर्जावरील निर्णय.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भ क्र. 1 अन्वये आपण ॲड प्रशांत डी. पंचाकशरी ह्यांनी दि. 10 मे 2022 रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईबाबत माहितीची मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने संदर्भ क्र. 2 अन्वये आपणांस लेखी कळविण्यात आले आहे. तथापी आपण संदर्भ क्र. 03 अन्वये माहिती मिळाली नसल्याचे नमुद करुन अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचेकडे प्रथम अपिल दाखल केलेले आहे.

उक्त अपिलीय अर्जावर दि. 23/09/2022 रोजी अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांनी सुनावणी आयोजित केली असता, आपण पुर्व सुचना देऊन या सुनावणीस अनुपस्थित राहिले होते व आपण उक्त अपिल अर्जावर सदर प्रकरणातील काही कागदपत्र उपलब्ध करुन देणेची विनंती केली होती.

आपल्या अपिलीय अर्जावर मा. अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांनी निर्णय पारित केलेला असुन उक्त निर्णयानुसार श्री. राजीव मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारीवर मा. महानगरपालिका आयुक्त यांचेकडे वेळोवेळी झालेल्या सुनावणींचे इतिवृत्तांत, हजेरीपत्रक व सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या प्रती आपणांस उपलब्ध करुन देत आहोत. (एकुण पाने 09)

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

pc 2U:\01 Pranali\Mahiti Adhikar\Letter - Saji.I.P..docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

विभाग :- नगरसचिव

(L)

टिपणी पान क्र. 07

दि. 31/5 /2018

(R)

फेर सादर

**विषय :-** **श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांनी आपले नामनिर्देशन पत्रामध्ये माहिती लपविल्यामुळे त्यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबत प्राप्त तक्रारीवर सुनावणी आयोजित करणेबाबत.**

**संदर्भ :-** **श्री. सजी.आय.पी. यांचेकडील दि. 08/01/2018 रोजीचा तक्रार अर्ज.** पान नं.५

1) उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्राद्वारे, श्री. सजी. आय. पी. यांनी मिरा भाईंदर महानगरपालिका नगरसेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांनी सार्वत्रिक निवडणुक लढविताना दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रामध्ये खोटी माहिती दिल्याची तक्रार दाखल केलेली असुन, उक्त संदर्भित तक्रार अर्जामध्ये श्री. सजी. आय. पी. यांनी पुढीलप्रमाणे मुद्दे नमुद केलेले आहेत.

1. श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांनी प्रभाग क्र. 19 (ड) मध्ये निवडणुक लढविताना दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रातील अ.क्र. 07 गुन्हेगारी पार्श्वभुमी या बाबीमध्ये (रकान्यामध्ये) आपल्या नावावर कोणताही गुन्हा नसल्याचे दाखविलेले आहे. वास्तविक त्यांचे नावावर मिरारोड पी.एस.सी.आर.नं. 2, 41/2015 ॲक्ट 63,65,69,51 आणि 37,51 अन्वये गुन्हा दाखल संबंधी न्यायालयामध्ये प्रलंबित असल्याची माहिती पोलिस अधिक्षक, ठाणे यांच्या पत्रामध्ये नमुद आहे. पान नं.१
2. तसेच मालमत्ता व दायित्व या तपशिलामध्ये त्यांनी आपल्या पत्नीच्या मालमत्तेबाबत कोणतीही माहिती दाखविलेली नाही. वास्तविक त्याच्या पत्नीच्या नावे बरीच मालमत्ता असल्याचे समजते त्यामुळे त्यांनी मालमत्ता लपविलेली आहे. पान नं.१

2) वरीलप्रमाणे श्री. सजी. आय.पी यांनी तक्रार दाखल करुन मा. राज्य निवडणुक आयोगाकडील पत्र क्र. एस.ई.एस/जी.ई.एन./2002/प्र.क्र.85/कार्यादेश-25, दि. 07 जुलै 2008 अन्वये भारतीय दंड संहितेचे कलम 171 जी, 177 व 181 अन्वये श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करुन त्यांचे नगरसेवक पद रद्द करणेची मागणी केली आहे. उक्त प्रकरणी तक्रारदार व प्रतिवादी यांच्यामध्ये सुनावणी आयोजित करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या माहितीच्या छायांकीत साक्षांकित प्रत



जन माहिती अधिकारी
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

३) तरी सदर प्रकरणी तक्रारदार व प्रतिवादी यांच्यामध्ये सुनावणी आयोजित करणेस व या सुनावणीस महानगरपालिका विधी अधिकारी यांना उपस्थित राहणेकरीता कळविणेस मान्यता मिळणेस विनंती आहे.

लिपीक (श्री. कैलास म्हात्रे)

नगरसचिव (श्री. वासुदेव शिरवळकर)

अ प्रमाणे शिफारस आहे

2/6/18

विधी अधिकारी (श्रीम. सई वडके)

मा. उपायुक्त (मु.) (श्री. विजयकुमार म्हसाळ)

| आ. दा. | |
|---|---|
| आ. क्र. | 243 |
| दिनांक | 06/06/2018 |

मा. आयुक्त (श्री. बालाजी खतगांवकर)

| आ. दा. | |
|---|---|
| आ. क्र. | 253 |
| दिनांक | 12/6/18 |

29/6/18

12:30 वाजता ठेवा.

14/6/18

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या माहितीच्या छायांकीत साक्षांकित प्रत
जन माहिती अधिकारी
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(७९६)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगरसचिव कार्यालय

दि. २९/०६/२०१८

श्री. सजी.आय.पी. यांनी दि. ०८/०१/२०१८ रोजी नगरसेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा ह्यांनी सार्वत्रिक निवडणूक २०१७ लढविताना दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रामध्ये खोटी माहिती दिलेबाबत तक्रार दाखल करुन श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करणेची मागणी केलेली आहे. या तक्रार अर्जावर दि. २९/०६/२०१८ रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला, आयुक्त दालन येथे सुनावणी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सुनावणीस खालील अर्जदार / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| १ | श्री./श्रीम. सजी आय. पी. | [signature] |
| २ | श्री./श्रीम. राजीव ओमप्रकाश मेहरा. | Rajeev M |
| ३ | श्री./श्रीम. ॲड. स्नेहलता कोळते. | S.Kolte |
| ४ | श्री./श्रीम. | |

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या माहितीच्या छायांकित साक्षांकित प्रत

जन माहिती अधिकारी
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(७०४)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगरसचिव कार्यालय

दि. १९/०९/२०१८

श्री. सजी.आय.पी. यांनी दि. ०८/०१/२०१८ रोजी नगरसेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा ह्यांनी सार्वत्रिक निवडणूक २०१७ लढविताना दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रामध्ये खोटी माहिती दिलेबाबत तक्रार दाखल करुन श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करणेची मागणी केलेली आहे. या तक्रार अर्जावर दि. १९/०९/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला, आयुक्त दालन येथे सुनावणी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सुनावणीस खालील अर्जदार / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| १ | श्री./श्रीम. ---- सजी आय.पी. ---- | |
| २ | श्री./श्रीम. ---------------------------------------- | |
| ३ | श्री./श्रीम. ---------------------------------------- | |
| ४ | श्री./श्रीम. ---------------------------------------- | |

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या माहितीच्या छायाप्रतीची साक्षांकित प्रत

जन माहिती अधिकारी
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(७०८)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगरसचिव कार्यालय

दि. १५/०३/२०१९

श्री. सजी.आय.पी. यांनी दि. ०८/०१/२०१८ रोजी नगरसेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा ह्यांनी सार्वत्रिक निवडणूक २०१७ लढविताना दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रामध्ये खोटी माहिती दिलेबाबत तक्रार दाखल करुन श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करणेची मागणी केलेली आहे. या तक्रार अर्जावर दि. १५/०३/२०१९ रोजी दुपारी १२.३० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, दुसरा मजला, आयुक्त दालन येथे सुनावणी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सुनावणीस खालील अर्जदार / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| १ | श्री./श्रीम. Rajeev Omprakash Mehta | [signature] |
| २ | श्री./श्रीम. Adv. Snehalata Kotte | [signature] |
| ३ | श्री./श्रीम. Saji I.P | [signature] |
| ४ | श्री./श्रीम. [illegible] | [signature] |

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या
माहितीच्या [illegible] प्रत

[illegible] अधिकारी
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगरसचिव कार्यालय

दि. ०८/१०/२०२१

श्री. सजी.आय.पी. यांनी दि. ०८/०१/२०१८ रोजी नगरसेवक श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा ह्यांनी सार्वत्रिक निवडणूक २०१७ लढविताना दाखल केलेल्या नामनिर्देशन पत्रासोबतच्या शपथपत्रामध्ये खोटी माहिती दिलेबाबत तक्रार दाखल करुन श्री. राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करणेची मागणी केलेली आहे. या तक्रार अर्जावर दि. ०८/१०/२०२१ रोजी सकाळी ११.४० वाजता कॉन्फरन्स हॉल, दुसरा मजला, स्व. कल्पना चावला अग्निशमन केंद्र, माहेश्वरी भवन मार्ग, भाईंदर (प.) येथे सुनावणी आयोजित करण्यांत आलेली होती. सदर सुनावणीस खालील अर्जदार / अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| १ | श्री./श्रीम. राजीव मेहरा | |
| २ | श्री./श्रीम. वकिल स्नेहलता गणेश कोळते | |
| ३ | श्री./श्रीम. [illegible] | |
| ४ | श्री./श्रीम. | |

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या
माहितीच्या छायाप्रतीची साक्षांकित प्रत

जन माहिती अधिकारी
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव विभाग,
जा.क्र.मनपा/न.स./ —— /२०१८
दि.२९/०६/२०१८

शुक्रवार दिनांक २९/०६/२०१८ रोजी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेसमोर दुपारी १२.१५ वा. श्री.राजीव ओमप्रकाश मेहरा, नगरसेवक यांचेविरुध्द श्री.सजी.आय.पी. यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त दालन, मिरा भाईंदर महानगरपालिका येथे सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | नांव | | पदनाम |
|---|---|---|---|
| १. | श्री.राजीव ओमप्रकाश मेहरा | - | नगरसेवक |
| २. | श्री.सजी.आय.पी. | - | तक्रारधार |
| ३. | श्रीम.स्नेहलता कोलते | - | श्री.राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे वकिल |
| ४. | श्री.वासुदेव शिरवळकर | - | नगरसचिव |
| ५. | श्रीम.सई वडके | - | विधी अधिकारी |

**सुनावणी दरम्यान तक्रारधारक श्री.सजी आय.पी. यांनी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केलेले आहेत.**

१. श्री.राजीव मेहरा यांचेवर गुन्हा दाखल असताना महापालिका निवडणूकीचे वेळी त्यांनी सदरची माहिती नामनिर्देशन पत्रामध्ये दर्शविलेली नाही.
२. श्री.राजीव मेहरा यांच्या पत्नीच्या नावावर असलेली मालमत्ता श्री.राजीव मेहरा यांनी महापालिका निवडणूकीचे वेळी त्यांनी सदरची माहिती नामनिर्देशन पत्रामध्ये दर्शविलेली नाही.

तरी, मा.निवडणूक आयोगाच्या आदेशाच्या अनुषंगाने श्री.राजीव ओमप्रकाश मेहरा यांचेवर अपात्रतेची कार्यवाही करण्यात यावी.

**सुनावणी दरम्यान श्री.राजीव ओमप्रकाश मेहरा यांचे वतीने श्रीम.स्नेहलता कोलते यांनी खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केलेले आहेत.**

१. तक्रारधारक श्री.सजी.आय.पी. यांनी आमचे अशील श्री.राजीव ओमप्रकाश मेहरा यांचेविरुध्द केलेल्या तक्रारीबाबत माहिती नसल्याने आज काही म्हणणे मांडावयाचे नाही.
२. तक्रारधारक श्री.सजी.आय.पी. यांनी केलेल्या तक्रारीची कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यास पुढील सुनावणीचे वेळी आम्ही आमचे म्हणणे सादर करु.

**सुनावणीतील निष्कर्ष व निर्णय :-**

१. नगरसचिव विभागाने श्री.सजी.आय.पी., तक्रारधारक यांनी दाखल केलेली तक्रार व इतर कागदपत्रे श्री.राजीव ओमप्रकाश मेहरा यांना उपलब्ध करुन देण्यात यावीत.
२. प्रकरणात [illegible] पुढील सुनावणी नगर सचिव विभागाने आयोजित करावी.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त 29/6/18
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या
माहितीच्या [illegible] प्रत
[illegible] अधिकारी
[illegible]
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

आयुक्त दालन
दि. 19/09/2018

**दि. 19/9/2018 रोजी मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली, झालेल्या सुनावणीचे इतिवृत्तांत**

आज बुधवार दि. 19/9/2018 रोजी दुपारी 12.00 वा. मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मा. आयुक्त कार्यालयात श्री. सजी.आ. पी. यांनी केलेल्या तक्रारी विषयी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस खालील प्रमाणे अधिकारी नगरसेवक/नगरसेविका तसेच तक्रारदार उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थिताचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | श्री. बालाजी खतगांवकर | मा. आयुक्त |
| 2 | श्री. वासुदेव शिरवळकर | नगरसचिव |
| 3 | श्री. सजी.आय पी. | तक्रारदार |

- **श्री. सजी. आय.पी. यांचे म्हणणे :-**
  मी केलेल्या तक्रारीनुसार ह्या विषयावर चौकशी करुन निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

- **मा. आयुक्तांनी दिलेले निर्देश :-**
  श्री. राजीव मेहरा ह्याच्या नातेवाईकाचे निधन झाल्याने ते सुनावणीस उपस्थित राहू शकत नसलेबाबत त्यांनी त्यांचे वकीलामार्फत लेखी कळविले आहे. सुनावणीवेळी दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकू घेणे अपेक्षीत आहे. श्री. राजीव मेहरा अनुपस्थित असल्याने सुनावणीस पुढील तारीख देण्यात यावी.

(बालाजी खतगांवकर)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिक

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या
माहितीच्या छायाप्रतीची साक्षांकित प्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**आयुक्त दालन**
**दि. १५/०३/२०१९**

## दि. १५/०३/२०१९ रोजी मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली, झालेल्या सुनावणीचे इतिवृत्तांत

आज सोमवार दि.१५/०३/२०१९ रोजी दुपारी १२.३० वा. मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मा. आयुक्त कार्यालय, कक्षात श्री. सजी.आय.पी. यांनी केलेली तक्रारी विषयी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस खालील प्रमाणे अधिकारी नगरसेवक/नगरसेविका तसेच तक्रारदार उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थितांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | श्री. बालाजी खतगांवकर | मा. आयुक्त |
| 2 | श्री. वासुदेव शिरवळकर | नगरसचिव |
| 3 | श्री. साबीर शेख | तक्रारदार |
| 4 | श्री. राजीव मेहरा | नगरसेवक |
| 5 | श्री. सई वडके | विधी अधिकारी |
| 6 | श्रीम. स्नेहलता कोलते | राजीव मेहरा यांचे वकील |

- **श्री. सजी आय.पी. यांची म्हणणे :-**
  1) श्री राजीव मेहरा नगरसेवक यांनी त्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी त्यांच्यावर असलेले गुन्हे हे नामनिर्देशन पत्रामध्ये नमुद केलेले नाहीत. तसेच त्यांचे पत्नीच्य ज्या मालमत्ता आहेत त्या त्यांनी नामनिर्देशन पत्रात उल्लेख केलेल्या नाहीत. मी ह्या पुर्वी दिलेले लेखी म्हणणे आहे ते विचारात घ्यावे
  2) माझे असे म्हणणे आहे की, श्री राजीव मेहरा आणि त्यांची पत्नी हे एकत्र राहतात. त्यांचे एकत्र कुंटूंब असल्यामुळे त्यांचे उत्पन्न दाखवायलाच पाहिजे अशी माझी विनंती आहे.
- **श्री राजीव मेहरा यांचेमार्फत ॲड. स्नेहलता कोलते यांनी मांडलेले म्हणणे :-**

  ह्यामध्ये माझे लेखी डिटेल रिप्लाय मी सादर करते,
  1) मी नगरसेवक श्री. राजीव मेहरा यांचे बाबत सविस्तर रिप्लाय दिलेला आहे. जे माझ्या नगरसेवकावर दोन गुन्हे होते, ते मा. उच्च न्यायालयाने रद्द केलेले आहेत. तथापी माझ्या नगरसेवकांच्या पत्नी बाबत आक्षेप आहेत. त्याबाबत मी लेखी म्हणणे आपल्यासमोर सादर केलेले आहे.
  2) माझे अशिल यांनी नामनिर्देशन पत्र भरले होते त्यावेळी त्यांनी नमुद केले होते की, माझी पत्नी जी आहे ती माझ्यापासुन वेगळी आहे आणि तिचे उत्पन्न वेगळं आहे. त्यामुळे माझी पत्नी जरी असली, तरी आम्ही वेगळे असल्यामुळे मला तिचे उत्पन्न शेअर करण्याचा हक्क पोहोचत नाही. अशा प्रकारचे डिक्लेरेशन माझे अशिल श्री. राजीव मेहरा यांनी नामनिर्देशन फॉर्म भरतांनाच दिले होते.
- **मा. आयुक्तांनी दिलेले निर्देश :-**
  1) श्री. सजी आप. पी. यांचे तीन आक्षेप आहेत. दोन सारखेच आहेत आणि एक ॲडिशनल आहे तो विचारात घ्यायचा आहे. महापालिकेच्या अधिनियमातील सेक्शनखाली आहेत त्यानुसार प्राधिकृत ऑथॉरिटीनेच डिसकॉलीफिकेशनचा निर्णय घेतला पाहिजे. आयुक्तांसोबत डिसक्वॉलीफिकेशनचा विषय येत नाही असे मला म्हणायचे आहे.

**(बालाजी खतगांवकर)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या
माहितीच्या [illegible] प्रत
[illegible] अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## दि. ०८/१०/२०२१ रोजी मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली, झालेल्या सुनावणीचे इतिवृत्तांत

आज शुक्रवार दि.०८/१०/२०२१ रोजी सकाळी ११.४० वा. मा. आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली कॉन्फरन्स हॉल, दुसरा मजला, स्व. कल्पना चावला अग्निशम केंद्र, माहेश्वरी भवन मार्ग, भाईंदर (प.) येथे श्री. सजी.आय.पी. यांनी केलेल्या तक्रारी विषयी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीस खालील प्रमाणे अधिकारी, तसेच तक्रारदार व प्रतिवादी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्याचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्री. दिलीप ढोले | मा. आयुक्त |
| २ | श्री. वासुदेश शिरवळकर | नगर सचिव |
| ३ | श्री. राजीव मेहरा | नगरसेवक |
| ४ | श्री. सजी.आय.पी. | तक्रारदार |
| ५ | ॲड स्नेहलता गणेश कोलते | ॲडव्होकेट |

**नगरसचिव :-**

यांची तिच तक्रार आहे माहिती पत्रामध्ये माहिती खोटी दिलेली आहे.

**ॲड. स्नेहलता कोलते :-**

त्यांनी नॉमिनेशन फॉर्म मध्ये तसे त्यांनी मेन्शन केलेले आहे की ते इंडिपेंडन्ट आहेत. ती स्व:त द्यायला तयार आहे.

**मा. आयुक्त :-**

इंडिपेंडन्ट असल्याचे पुरावे काय असतात?

**ॲड. स्नेहलता कोलते :-**

इंडिपेंडन्ट याचा अर्थ असा की मी यांच्यावर डिपेंड नाही मी स्व:त कमवते.

**राजीव मेहरा :-**

मैने नॉमिनेशन फॉर्म मै अफेडेव्हीट दिया था कोई ऑब्जेक्शन नही आया था ।

**ॲड. स्नेहलता कोलते :-**

तुम्हाला हे कराचे असेल तर १० दिवसात कोर्टामध्ये तुम्हाला इलेक्शन पिटीशन दाखल करावे लागेल. मी त्यासंदर्भात सगळे दाखल केलेले आहे.

**सजी.आय.पी :-**

परिपत्रकात असा उल्लेख केलेला आहे की त्यांना माहिती पडले तर आपण कार्यवाही करु शकतो.

**ॲड. स्नेहलता कोलते :-**

साहेब सेक्शन १६ मध्ये पेसिफिक म्हटलेले आहे महाराष्ट्र म्युन्सीपल कार्पोरेशन ॲक्ट मध्ये.

**राजीव मेहरा :-**

मेरे सबमिशन सब दिये हूये है ।

**मा. आयुक्त :-**

ठिक आहे तपासुन घेतो.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

माहितीचा अधिकार 2005 अंतर्गत दिलेल्या
माहितीच्या छायाप्रतीची साक्षांकित प्रत

जनमाहिती अधिकारी
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
स.न./न.प./न.न. मा.अ.अ.
आवक क्र. ०१
दिनांक:- ८/९/२०२२

# जोडपत्र "ब"
## (नियम ५ (१) पाहा)
### केंद्र शासन माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ याच्या कलम १९ (१) अन्वये अपिल

प्रति,
मा. अपीलीय अधिकारी,
नगरसचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.



| | | |
|---|---|---|
| १) अपिलकाराचे पुर्ण नांव | : | श्री. सजी. आय. पी., |
| २) अपिलकाराचा पुर्ण पत्ता | : | शॉप नं. ८, हैप्पी होम अपार्टमेंट, बिल्डींग नं. १, शांती पार्क, मिरारोड पूर्व, ता. जि. ठाणे., ४०१ १०७ मो. नं. ९८२०२२६७११ |
| ३) संबंधित माहिती अधिकाऱ्याचा तपशील | : | श्री. कैलास दा. म्हात्रे, जनमाहिती अधिकारी, नगरसचिव विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका |
| ४) आवश्यक असलेल्या माहीतीचा तपशील आवश्यक असलेल्या माहीतीचा विषय व स्वरूप | : | ॲड. प्रशांत डी. पंचाकशरी हयांनी दिनांक १० मे २०२२ रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईबाबत माहितीची मागणी केलेली आहे. |
| ५) अपिल करण्यासाठी अखेरची तारीख | : | दिनांक ०८.०८.२०२२ रोजी पत्र क्र. जा. क्र. मनपा/सचिव/मा. अ./मा. अ./ ५१/२०२२, |
| ६) अपिल करण्याचे प्रयोजन | : | माहीती मिळाली नसल्याने. |

ठिकाण : भाईंदर
दिनांक : ०७.०९.२०२२

सही

(श्री. सजी. आय. पी.)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./अपिल/09 /2022 दिनांक :- १७ / ९ /2022

प्रति,
श्री. सजी आय. पी.,
शॉप नं.8, हॅप्पी होम अपार्टमेंट,
बिल्डींग नं.1, शांती पार्क, मिरारोड (पूर्व)
ता.जि. ठाणे.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
ॲड. प्रशांत डी. पंचाकशरी ह्यांनी दिनांक 10 मे 2022 रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 07/09/2022 रोजीचा अपिलीय अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपण दि. 25/07/2022 रोजी माहिती अधिकार नियमाअंतर्गत अर्ज दाखल करुन ॲड प्रशांत डी. पंचाकशरी ह्यांनी दि. 10 मे 2022 रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईबाबत माहितीची मागणी केलेली होती. संदर्भित अपिलाद्वारे आपण उक्त माहिती मिळाली नसल्याचे नमुद करुन प्रथम अपील दाखल केलेले आहे.

आपण दाखल केलेल्या प्रथम अपिलीय अर्जावर शुक्रवार दि. 23/09/2022 रोजी सकाळी 11.30 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर सुनावणीच्या वेळी आपण उपस्थित रहावे.

(वासुदेव शिरवळकर)
अपिलीय अधिकारी तथा
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
मिरा भाईंदर महानगरपालिका.

pc 2W\01 Nagar Sachiv\Mahiti Adhikar\Apil 2017\Letter - Saji IP.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./अपिल/ ०७ /2022 दिनांक :- १३ / ९ /2022

प्रति,
श्री. सजी आय. पी.,
शॉप नं.8, हॅप्पी होम अपार्टमेंट,
बिल्डींग नं.1, शांती पार्क, मिरारोड (पूर्व)
ता.जि. ठाणे.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.
ॲड. प्रशांत डी. पंचाकशरी ह्यांनी दिनांक 10 मे 2022 रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईबाबत.

संदर्भ :- आपणांकडील दि. 07/09/2022 रोजीचा अपिलीय अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपण दि. 25/07/2022 रोजी माहिती अधिकार नियमाअंतर्गत अर्ज दाखल करुन ॲड प्रशांत डी. पंचाकशरी ह्यांनी दि. 10 मे 2022 रोजी दिलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईबाबत माहितीची मागणी केलेली होती. संदर्भित अपिलाद्वारे आपण उक्त माहिती मिळाली नसल्याचे नमुद करुन प्रथम अपील दाखल केलेले आहे.

आपण दाखल केलेल्या प्रथम अपिलीय अर्जावर शुक्रवार दि. 23/09/2022 रोजी सकाळी 11.30 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सदर सुनावणीच्या वेळी आपण उपस्थित रहावे.

(वासुदेव शिरवळकर)
अपिलीय अधिकारी तथा
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीस्तव :-
जनमाहिती अधिकारी तथा लिपीक
मिरा भाईंदर महानगरपालिका.

pc 2W:\01 Nagar Sachiv\Mahiti Adhikar\Apil 2017\Letter - Saji IP.docx

# Saji I. P.

Shop No. 8, Happy Home Apt. No. 1, Shanti Park, Mira Road (E), Thane - 401 107.
Mob.: 9820226711


22-09-2022

प्रति,
वासुदेव शिरवळकर,
अपिलीय अधिकारी,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी २००५ चे प्रथम अपिलीय संदर्भात.

संदर्भ :- जा.क्र. मनपा/सचिव/मा.अ./अपिल/०१/२०२२ दि.१३/०८/२२.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, दि. २३/०८/२०२२ रोजी मुंबई येथे मा. मानवाधिकारी यांच्याकडे सुनावणी असल्याकारणाने आपण आयोजित केलेल्या सुनावणीमध्ये मी येऊ शकणार नाही. माझी आपणांस विनंती आहे की, मी मागितलेल्या माहिती देण्याचा आदेश माहिती अधिकारी यांना देण्यात यावी. ही नम्र विनंती.

आपला विश्वासू

साजी. आय. पी.

O/C

(49)

# मिरा भाईदर महानगरपालिका

जा.क्र.मा.अधि./अपिल/01/2022
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगरसचिव
मिरा भाईदर महानगरपालिका.
दि. 23/09/2022

**प्रथम अपिलिय अधिकारी तथा नगरसचिव मिरा भाईदर महानगरपालिका यांचेसमोर माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील**

श्री. सजी आय. पी., ...... अपिलार्थी
शॉप नं.8, हॅप्पी होम अपार्टमेंट,
बिल्डींग नं.1, शांती पार्क, मिरारोड (पूर्व)
ता.जि. ठाणे.

विरूध्द

जनमाहिती अधिकारी ...... प्रतिवादी
नगरसचिव विभाग
मिरा भाईदर महानगरपालिका

:- विवेचन :-

अपिलार्थी श्री. सजी आय. पी., पत्ता :- 004, बी शॉप नं.8, हॅप्पी होम अपार्टमेंट, बिल्डींग नं.1, शांती पार्क, मिरारोड (पूर्व) ता.जि. ठाणे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार जनमाहिती अधिकारी, नगरसचिव विभाग यांचेकडे दि. 25/07/2022 रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला होता.

**अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल :-**

अपिलार्थी यांनी ॲड प्रशांत डी. पंचाकशरी हयांनी दि. 10 मे 2022 रोजी नगरसचिव विभागात दाखल केलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईबाबत माहितीची मागणी केलेली आहे.

**अपिल दाखल करण्याची कारणे :-**

माहिती मिळाली नसल्याचे नमुद करुन अपीलार्थी यांनी दि. 07/09/2022 रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले आहे.

**सुनावणीचा तपशिल :-**

अपिलार्थी श्री. सजी आय.पी. यांचे प्राप्त अपिल अर्जावर शुक्रवार दि. 23/09/2022 रोजी सकाळी 11.30 वाजता सुनावणी आयोजित करण्यात आली असून तसे अपिलकर्ता व जनमाहिती

अधिकारी, नगरसचिव विभाग यांस दि. 13/09/2022 रोजीच्या पत्रान्वये सुनावणीस उपस्थित राहणेबाबत लेखी कळविले आहे.

तथापी दि. 23/09/2022 रोजी अपिलकर्ता यांची मानवाधिकारी यांच्याकडे सुनावणी असल्याने अपिलार्थी आज आयोजित सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याचे अपिलार्थी यांनी दि. 22/09/2022 रोजीच्या पत्रान्वये अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांना लेखी कळविले आहे. तसेच त्यांस माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जनमाहिती अधिकारी यांना आदेशीत करण्याची विनंती केलेली आहे.

सुनावणीस जनमाहिती अधिकारी, नगरसचिव विभाग हे उपस्थित आहेत.

**अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

अपिलार्थी आज सुनावणीस उपस्थित राहणार नसल्याचे त्यांनी लेखी कळविले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आपले म्हणणे मांडावे.

**जनमाहिती अधिकारी यांचा सुनावणी दरम्यान युक्तीवाद :-**

अपिलार्थी यांनी दि. 25/07/2022 रोजी माहिती अधिकार नियमांतर्गत अर्ज दाखल केलेला असून, अपलिार्थी यांनी ॲड प्रशांत डी. पंचाकशरी ह्यांनी दि. 10 मे 2022 रोजी नगरसचिव विभागात दाखल केलेल्या पत्रावर केलेल्या कारवाईबाबतची माहिती मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने अपिलार्थी यांना दि. 13/09/2022 रोजी लेखी पत्राद्वारे माहिती दिलेली आहे.

**अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तीवाद :-**

ॲड प्रशांत डी. पंचाकशरी ह्यांनी दि. 10 मे 2022 रोजी दाखल केलेल्या पत्राचे अवलोकन केले असता, ॲड प्रशांत डी. पंचाकशरी ह्यांचे श्री. सजी आय.पी. यांनी यापूर्वी श्री. राजीव मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबत दाखल केलेल्या तक्रारीसंबंधीत पत्र आहे. जनमाहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणातील मुळनस्तीचे अवलोकन करून अपिलार्थी यांना लेखी पत्राद्वारे दिलेली माहिती बरोबर आहे.

तथापी अपिलार्थी यांनी माझेशी प्रत्यक्ष संपर्क साधून विनंती केली आहे की, श्री. राजीव मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारीवर मा. महानगरपालिका आयुक्त यांचेकडे वेळोवेळी झालेल्या सुनावणींचे इतिवृत्तांत, हजेरीपत्रक व सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या प्रतीं देण्यास जनमाहिती अधिकारी यांना आदेशीत करावे.

**-: निर्णय :-**

अपिलार्थी श्री. सजी आय.पी. यांनी दि. 25/07/2022 रोजी माहिती अधिकार नियमांतर्गत दिलेल्या अर्जास माहिती मिळाली नसल्याचे नमुद करुन अपीलार्थी यांनी दि. 07/09/2022 रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले आहे.

अपिलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी, नगरसचिव विभाग यांनी दिलेली माहिती योग्य व बरोबर आहे. करिता श्री. सजी आय.पी. यांनी दि. 07/09/2022 रोजी दाखल केलेले प्रथम अपिल फेटाळण्यात येत आहे.

तथापी, अपिलकर्ता यांनी यापूर्वी अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव यांस प्रत्यक्ष भेटून विनंती केलेनुसार व सामाजिक न्याय देणेचे दृष्टीकोनातून अपिलकर्ता यांस श्री. राजीव मेहरा यांचे नगरसेवक पद रद्द करणेबाबत दाखल करण्यात आलेल्या तक्रारीवर मा. महानगरपालिका आयुक्त यांचेकडे वेळोवेळी झालेल्या सुनावणींचे इतिवृत्तांत, हजेरीपत्रक व सादर करण्यात आलेल्या अहवालाच्या प्रती जनमाहिती अधिकारी, नगरसचिव विभाग यांनी 10 दिवसात द्याव्यात.

(वासुदेव शिरवळकर)
अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,

1) श्री. सजी आय. पी.,
शॉप नं.8, हॅप्पी होम अपार्टमेंट,
बिल्डींग नं.1, शांती पार्क, मिरारोड (पूर्व)
ता.जि. ठाणे.

2) जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईदर महानगरपालिका

3) माहिती अधिकार अपील नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगरसचिव यांचे कार्यालय

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगरसचिव कार्यालय

दि. 23/09/2022

श्री. सजी आय.पी. यांनी दि. 25/07/2022 रोजी दाखल केलेल्या अर्जावर माहिती माहिती प्राप्त न झाल्याने दि. 07/09/2022 रोजी प्रथम अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिलीय अर्जावर दि. 23/0/2022 रोजी सकाळी 11.30 वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय, तिसरा मजला, नगरसचिव दालन येथे सुनावणी आयोजित करण्यांत आली असता सदर सुनावणीस खालील अधिकारी उपस्थित असून, अपिलार्थी लेखी पुर्वसुचना देऊन गैरहजर राहिलेले आहेत.

| अ.क्र. | नांव | सही |
|---|---|---|
| 1 | श्री./श्रीम. वासुदेव शिरवळकर<br>अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव | (सही) |
| 2 | श्री./श्रीम. कैलास दामोदर म्हात्रे<br>जनमाहिती अधिकारी | (सही) |
| 3 | श्री.1/श्रीम. -------------------------------------------- | |